# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **04/04/2020**

**Brief of the work done :-**

पो.स्टे. मालेगाव येथे पोलीसांची माणुसकी, मजुर महिलेला खायला देतांना पोलीस कर्मचारी

## मालेगाव येथे पोलिसांची अशीही माणुसकी

- मालेगाव : कोरोना विषाणू संसर्गाच्या पृष्ठभूमीवर प्रत्येकाकडून काळजी घेतली जात आहे. संचारबंदी आणि लॉक डाऊनमुळे गोरगरीब, मजुरी करणाऱ्यांची मोठी पंचाईत झाली असून, २ एप्रिल रोजी मालेगाव परिसरात शेतातून परत येत असलेल्या मजूरांना आणि लहान मुलाला पोलीस कर्मचाऱ्याने खाण्याचे व्यवस्था करुन माणुसकीचा परिचय दिला.
- कोरोना विषाणू संसर्गाला प्रतिबंध म्हणून प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. पोलिस प्रशासनातर्फे शहरात बंदोबस्त ठेवून घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले जात आहे. २ एप्रिल रोजी शेतातून परत येत असलेल्या काही मजूरांना आणि लहान मुलाला एका पोलीस कर्मचाऱ्याने खायला दिले तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली.



मजूर महिलेला खायला देताना पोलीस कर्मचारी.